C962

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

क्रमांक:पोआअ/आस्था-प्रलि/पदोन्नती/पोह ते सपोउनि//२०२०
पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे कार्यालय, कॅम्परोड,
अमरावती, दूर क्र.०७२१-२५५१००१,फॅक्स क्र.-२५५१०१०
ई मेल आयडी- cp.amravati@mahapolice.gov.in
दिनांक :- 18 DEC 2020

---

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील पोलीस हवालदार (वर्ग-क) संवर्गातील खालील नमुद पोलीस अंमलदार यांना मा. सर्वाच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधिन राहुन **सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (वर्ग-क)** यापदावर वेतन स्तर एस-१० (रु.२९२००-९२३००) मध्ये **आदेशाच्या दिनांक पासून** तात्पुरत्या स्वरुपात नियमित पदोन्नती खालील अटीच्या अधीन राहुन देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदाराचे नांव, पदनाम व ब.नं. | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|
| १. | पोहवा/१४०४, संजय रामदास वरखडे | खुला (ज्येष्ठतेनुसार) |
| २. | पोहवा/६१६, श्रीरंग धोंडूपंत गाढवे | खुला (ज्येष्ठतेनुसार) |
| ३. | पोहवा/७४७, देवानंद वामनराव बाजड | खुला (ज्येष्ठतेनुसार) |
| ४. | पोहवा/७५६, राजेश गडलिंग | खुला (ज्येष्ठतेनुसार) |
| ५. | पोहवा/७६५, शामसुंदर वि.तायडे | खुला (ज्येष्ठतेनुसार) |

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यसन-१२ दिनांक ०१ ऑगस्ट, २०१९ अन्वये दिलेल्या निर्देशांनुसार सन २०१९-२०२० च्या वित्तिय वर्षाची माहे मार्च २०२० अखेर पर्यंतची मत्ता व दायित्वाची विवरणपत्रे सादर केले नसल्याने त्यांनी तात्काळ सदर विवरणपत्र सादर करावे आणि ती त्यांची स्वत:ची जबाबदारी राहील. **त्यांना देण्यांत आलेली पदोन्नती या कारणास्तव कोणत्याही वेळी काढून घेण्यांत येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

३. उपरोक्त पोलीस हवालदार यांना आता निलंबित केले असेल किंवा त्यांच्या विरुध्दं नव्याने गंभीर कसूरीबाबत विभागीय चौकशी प्रलंबित असेल किंवा न्यायालयात खटला चालू असेल किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील तर असे निदर्शनास आल्यास त्यांना पदोन्नती न देता याकार्यालयास तात्काळ कळविण्यांत यावे.

४. तसेच सदरहू आदेश हे शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ A/१६-ब, दि. १८-१०-२०१७ व दि.१९-१२-२०१७ मध्ये स्पष्ट केल्यानुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दि.४-८-२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका डायरी क्र.३३१५१/२०१७ दाखल केली आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती कालावधीत, राज्य शासनाच्या वतीने मा.सर्वोच्य न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्र.३३१५१/२०१७ तसेच विशेष

Scanned with CamScanner

अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ वर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून, शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि. २५-५-२००४ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षण न देता **तुर्तास शासन पत्र साप्रवि दि. २९-१२-२०१७ व शासन पत्र साप्रवि क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.४६७ए/१६-ब, दि. ११-१०-२०१८ प्रमाणे पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार पदे भरण्यांत येत आहे.**

**५. शासन निर्णय वित्त विभाग क्र.पीएचवाय/१०८२/सिआर/११००(२)/एसईआर-३ दि.०६/११/१९८४ अन्वये पदोन्नती नंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्या नंतर वेतन निश्चीती करण्या बाबतचा विकल्प दयावयाचा असेल तर तो पदोन्नती दिल्याच्या दिनांकापासुन १ महिण्याच्या आत देण्यात यावा.अशा प्रकारचा विकल्प विहित १ महिण्याच्या आत न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतन निश्चीती म.ना.सेवा(वेतन)नियम १९८१ मधील नियम ११(१)(ए) प्रमाणे पदोन्नतीचा दिनांक विचारात घेवुन करण्यात येईल या बाबत नोद घ्यावी.**

६. प्रतिनियुक्तीवर असलेल्या पोलीस अंमदारांच्या बाबतीत त्यांनी पदोन्नती स्विकारल्याचा दिनांक संबधीत घटकाने न चुकता याकार्यालयास कळवावा तसेच त्यांना पदोन्नती नाकारावयाची असल्यास त्याबाबत त्यांचा लेखी अर्ज याकार्यालयात पाठविण्यात यावा.

**७. पदोन्नत झालेल्या सर्व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकांचे अभिनंदन व शुभेच्छा.**

**(डॉ.आरती सिंह)**
पोलीस आयुक्त, अमरावती शहर

प्रति,

सर्व पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे/शाखा, अमरावती शहर

प्रत,

प्रशासकीय अधिकारी/कार्यालय अधिक्षक/स्विय्य सहाय्यक/प्रमुख लिपीक (पत्रव्यवहार शाखा/लेखा शाखा

प्रत :- विभागीय चौकशी शाखा लिपीक /कसुरी लिपीक

२/- यांनी पदोन्नत झालेल्या पोलीस कर्मचारी यांच्या विरुध्द विभागीय चौकशी प्रलंबीत गुन्हे त्यांचे स्वरुप तसेच ते शिक्षा भोगत असल्यास तसे त्वरीत कळवावे.

प्रत अग्रेषित,

पोलीस उपायुक्त (मुख्यालय)/परिमंडळ १ व २, अमरावती शहर.

प्रत,

आस्थापना लिपीक/वेतन निश्चिती लिपीक/वेतन लिपीक (लेखा शाखा)/पोलीस पत्रिका लिपीक/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी. त्यांनी पदोन्नती दिलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या सेवापटामध्ये पदोन्नतीची नोंद घेण्याची, पदोन्नती पदावर वेतन निश्चिती करण्याची तसेच आस्थापना विषयक संबंधित नोंदवहीमध्ये पदोन्नतीची नोंद घेण्याची आवश्यक ती योग्य कार्यवाही करण्यांत यावी.

*****

Scanned with CamScanner